| | |
|---|---|
| MHYA190005622022 | दाखल दिनांक – २३.०६.२०२२<br>नोंदणी दिनांक – २३.०६.२०२२<br>निकाल दिनांक – १२.०८.२०२६<br>कालावधी – ०४वर्ष, ०१म. २०दि |

## २ रे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, राळेगाव यांचे न्यायालयात.

**(पिठासीन अधिकारी श्री. रामचंद्र दत्तात्रय माने)**

**नि.फौ.ख.क्र.३६/२०२२** **नि. क्र. ३४**

**फॉर्म – अ**

| | |
|---|---|
| तक्रारदार / फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन वडकी, ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रतिनिधीत्व | शासनातर्फे विद्ववान विधिज्ञ श्रीमती पी. ए. इंगळे , |
| आरोपी | **विकास पुंडलीक सेवेकार,**<br>वय–२५ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. येवती ता.राळेगाव जि. यवतमाळ |
| प्रतिनिधीत्व | आरोपी क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री.पी. के. वर्मा. |

**फॉर्म – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ | दि. १३.०५.२०२२ रोजी सायंकाळी १०.०० वाजताच्या सुमारास मौ.येवती येथील फिर्यादीच्या घरासोर ता.राळेगाव जि.यवतमाळ. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १६.०५.२०२२ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | २४.०८.२०२३ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | २४.०८.२०२३ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाची तारीख | १२.०८.२०२६. |

| | |
|---|---|
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर. | निरंक. |

## फॉर्म – क

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **विकास पुंडलीक सेवेकार** | | | भा.दं.वि. कलम २९४,४२७, १८९ | निर्दोष | – | – |

## फॉर्म – ड

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी.**

**(अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | छाया गणेश दरोडे | फिर्यादी |
| सरकारी सा.क्र.२ | चिंधू राघोबाजी भोयर | घटनास्थळ पंच |
| सरकारी सा.क्र.३ | गणेश नथ्थुजी दरोडे | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.४ | शशीकांत मधूकर निमसटकर | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.५ | राम वसंतराव कुरटकर | घटनास्थळ पंच |
| सरकारी सा.क्र.६ | शैलेश कवडूजी मानकर | साक्षीदार |

**(ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| |
|---|
| निरंक |

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी.**

**(अ) फिर्यादी नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र.२२ | फिर्यादी |
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र.२३ | छापील प्रथम खबर अहवाल |
| सरकारी सा.क्र.२ | नि.क्र.२४ | घटनास्थळ पंच |
| सरकारी सा.क्र.३ | नि.क्र.२५ | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.४ | नि.क्र.२६ | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.५ | नि.क्र.२८ | घटनास्थळ पंच |
| सरकारी सा.क्र.५ | नि.क्र.२९ | घटनास्थळ पंचनामावरील अनु.क्र. २ वरील सहीस |
| सरकारी सा.क्र. ६ | नि.क्र.३० | साक्षीदार |

**(ब) बचाव पक्ष नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | दोषारोप | (नि.क्र.१६) |
| २ | आरोपीची जबानी | (नि.क्र.१७) |

**(ड) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य
## (दि.१२.०८.२०२६ रोजी घोषीत)

आरोपी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २९४, ४२७,१८९ अन्वयें खटल्यास सामोरे जात आहे.

२. अभियोग पक्षाचे प्रकरण थोडक्यात असे आहे की, फिर्यादी ही गेल्या सात वर्षापासून ग्राम येवती येथे कोतवाल या पदावर कार्यरत असून तलाठी कार्यालय येवती येथे तलाठी कुणाल निळकंठ आडे यांच्यासह कामकाज करते. त्यांच्या गावातील विकास पुंडलीक सेवेकर रा. येवती याला फिर्यादी चांगल्या प्रकारे ओळखत असून तो त्याच्या ट्राक्टरने अवैधरित्या रेती वाहतूक करित असतो. दिनांक १३.०५.२०२२ रोजी फिर्यादीचे पती काही कामानिमीत्त वर्धा येथे गेले होते, रात्री १०.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या घरी त्यांचा मुलगा प्रियांशू गणेशराव दरोडे याच्यासह घरी आराम करीत असतांना घराच्या वॉल कंपांडला असलेल्या लोखंडी गेटचा जोराने आवाज आला म्हणून फिर्यादी बाहेर जावून पाहिले असता आरोपी नामे विकास पुंडलीक सेवेकर रा. येवती हा त्याच्या मोटरसायकलवर बसून होता आणि शिवीगाळ सुद्धा करीत होता. फिर्यादीने लोखंडी गेट पाहिले असता गेट वाकलेले दिसले तसेच विटेची भींतीला वार गेलेला दिसला, अंदाजे पाच हजार रुपयाचे नुकसान झाल्याचे फिर्यादीला दिसले, म्हणून फिर्यादीने आरोपीला तु माझ्या गेटला मोटर सायकलने ठोस मारून नुकसान का केले असे विचारले असता त्याने फिर्यादीला साले मादरचोद तु गेटच्या बाहेर ये तुला दाखवतो, तु आमची वाळुच्या ट्रक्टरची माहिती तुझ्या अधिका–यांना देते, तू तलाठी कार्यालयात जावुन झवुन घेते असे अश्लील भाषेत फिर्यादीला बोलत असतांना फिर्यादीचा घर शेजारी शैलेश कवडूजी मानकर हे धावत आले आणि त्यांस तू ऐवढया रात्री इथे येवून कोणाला शिव्या देत आहे अशे म्हटले असता

तू मला विचारणार कोण, सालेहो तुम्हाले पाहून घेतो अशी धमकी देवून तो त्याची मोटर सायकल घेवून पळून गेला, त्याच वेळी फिर्यादीचे पती गणेशराव दरोडे व पुतण्या ऋषभ दरोडे हे आले व फिर्यादीने घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगीतली. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला तू ट्राक्टरची माहिती अधिका–याना देते या कारणावरून अश्लील शिवीगाळ करून लोखंडी गेटचे तसेच विटेच्या भिंतीचे नुकसान करून लोकसेवकास जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून फिर्यादीने आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन वडकी येथे फिर्याद नोंदविली.

**३.** फिर्यादीच्या तक्रारीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्रमांक १४१/२०२२ कलम २९४, ४२७,१८९ नुसार भारतीय दंड विधान अंतर्गत नोंदविले. गुन्हयाच्या तपासादरम्यान पंचनामा कार्यवाही करुन, साक्षीदारांची बयाने नोंदविण्यात आली. तपासाअंती आरोपी विरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने न्यायालयासमक्ष आरोपपत्र दाखल करण्यात आले.

**४.** अभिलेखावरील संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन करुन आरोपी विरूध्द कलम २९४, ४२७,१८९ नुसार भारतीय दंड विधान अंतर्गत दोषारोप (नि.क्र.१६) निश्चित केले. आरोपीची जबानी (नि.क्र. १७) नोंदविली. आरोपीस आरोप मराठी भाषेमध्ये वाचुन, समजावुन सांगण्यात आले. आरोपी त्यांच्या जबानी दरम्यान गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटल्यास सामोरे जाण्याचे सांगितले, म्हणुन त्याच्याविरुध्द खटला चालविण्यात आला.

**५.** खटल्यातील पुरावा आणि दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर माझेसमक्ष खालील मुद्दे निश्चयार्थ उपस्थित झाले आणि त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, | ... नाही |

| | | |
|---|---|---|
| | दि.१३.०५.२०२२ रोजी रात्री १०.०० वाजताच्या सुमारास मौ. येवती ता.राळेगाव जि. यवतमाळ येथे फिर्यादीच्या घरासमोर आरोपीने फिर्यादीस त्रास होईल अश्या प्रकारे अश्लील कृती केली व अश्लील शब्द उच्चारले.? | |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी यांनी फिर्यादीच्या घराच्या वॉल कंपाउंडला असलेल्या लोखंडी गेटला मोटर सायकलने ठोस मारून आगळीक केली आणि त्यायोगे ५० रुपये किंवा त्याहुन अधिक रकमेपर्यंत हानी अथवा नुकसान घडवून आणले ? | ... नाही |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी यांनी फिर्यादी हीला लोक सेवक या नात्याने क्षती पोहचविण्याचा धाक दाखविला तसेच सार्वजणीक कार्याधीकाराच्या वापराशी निगडीत अशी कृती केली किंवा कृती करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल किंवा तिला विलंब लावण्याबद्दल कोणत्याही लोक सेवकाचे मन वळविण्यासाठी तुम्ही लोक सेवकाला म्हणजे फिर्यादीला क्षती पोहचविण्याचा अथवा फिर्यादीला धाक घातला? | ... नाही |
| ४. | आदेश काय? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**६.** अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी एकूण सहा साक्षीदार तपासले. सरकारी साक्षीदार क्र. १ छाया गणेश दरोडे (फिर्यादी) यांची साक्ष नि. २२ वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. २ चिंधु राघोबाजी भोयर (घटनास्थळ पंच ) यांची साक्ष नि. २४ वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. ३ गणेश नथ्थूजी दरोडे

(साक्षीदार ) यांची साक्ष नि. २५ वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. ४ शशीकांत मधूकर निमसटकर (साक्षीदार ) यांची साक्ष नि. २६ वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. ५ राम वसंतराव कुरटकर (घटनास्थळ पंच ) यांची साक्ष नि. २८ वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. ६ शैलेश कवडूजी मानकर (साक्षीदार) यांची साक्ष नि. ३० वर नोंदविली.सदर प्रकरणामध्ये बचाव पक्षाने त्यांचा एकही साक्षीदार तपासला नाही.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता</u> :-

७. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी विधिज्ञ व आरोपींचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. सरकारी साक्षीदार क्र. १ छाया गणेश दरोडे (फिर्यादी) यांची साक्ष नि. २२ वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, साक्षीदार आरोपीला ओळखते. साक्षीदार सन २०१५ पासुन येवती येथे कोतवाल या पदावर कार्यरत आहे. घटना ही दि. १३.०५.२०२२ रोजी अंदाजे रात्री १०.०० च्या सुमारास साक्षीदाराच्या घरी घडली होती. साक्षीदार व त्यांचा लहान मुलगा घरी आराम करिता होते. साक्षीदाराचे पती परगावी गेले होते. त्यावेळी एकदम घराच्या गेटचा आवाज आला. साक्षीदाराने घराचा दरवाजा उघडुन बाहेर पाहीले असता आरोपी हा गाडीवर बसुन होता व शिवीगाळ करिता होता. त्यावेळी साक्षीदाराने त्याला तु कुणाला शिवीगाळ करित आहे असे विचारले असता त्याने साक्षीदाराला साले मादरचोद, तु घराच्या बाहेर निघ तु त्यांच्या रेतीची माहिती वरच्या अधिका-याला देते असे म्हणून साक्षीदाराला शिवीगाळ केली, त्यानंतर साक्षीदाराचे घराचे शेजारी श्री. शैलेश मानकर हे त्या ठिकाणी आले त्यांनी आरोपीस तु एवढ्या रात्री कुणाल शिव्या देवुन राहिला असे विचारले असता आरोपीने त्यांना देखील साले मादरचोद तुम्हाला पाहुन घेईल अशी शिवीगाळ करुन गाडी घेवुन निघुन गेला. तेवढयात साक्षीदाराचे पती घरी

आले साक्षीदाराने त्यांना घटने बाबत सांगीतले त्यानंतर साक्षीदार पोलीस ठाण्यात गेले व तोंडी रिपोर्ट दिला. साक्षीदाराला छापील प्रथम खबरी अहवाला दाखवीण्यात आला. त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क. २३ देण्यात येत आली. साक्षीदाराच्या सोबत त्यांचा पुतण्या देखील होता. पोलीसांनी साक्षीदाराकडे घटनेबाबत विचारपुस केली व बयाण नोंदविले. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने कथन केले की, घटना हि दि. १३.०५.२०२२ रोजी घडली होती. साक्षीदाराचे घराच्या आजुबाजुला ईतर लोकांची घरे असुन समोर रस्ता आहे व त्याच्या पलीकडे मंदीर आहे. त्या रस्त्यावरुन लोकांचे जाणेयेणे चालु असते. साक्षीदाराने घटने नंतर १५ ते २० मिनीटात साक्षीदार पोलीस ठाण्यात गेले होते व त्याच दिवशी रिपोर्ट दिला. रिपोर्ट दिल्या नंतर दुस–या किंवा तिस–या दिवशी पोलीस चौकशी करिता घरी आले होते. साक्षीदार चौकशी करिता पोलीस ठाण्यात गेले होते. साक्षीदार मान्य करतात की, साक्षीदाराने न्यायालयात साक्ष देण्यापुर्वी प्रथम खबरी अहवाल व त्यांचे बयाण वाचले होते, वर्तमानपत्रा मध्ये अवैध्य रेती वाहतुकी बाबत बातम्या प्रसारीत होत असतात. हे साक्षीदाराला माहित नाही की, कोतवाल, तलाठी, तहसीलदार यांच्या संगनमतानेच वरिल बेकायदेशीर प्रकार सुरु असतात अशा बातम्या वर्तमाणपत्रात प्रसारीत होत असतात. साक्षीदाराने पोलीसांना बयाण देते वेळी घटनास्थळी शैलेश मानकर आले होते, हि बाब सांगीतली होती. साक्षीदाराने पोलीस ठाण्यात स्वतः जावुन रिपोर्ट दिला होता. असे काही घडले नाही की, साक्षीदाराने कोतवाल संघटनेचे अध्यक्ष यांचेकडे रिपोर्ट दिला होता व त्यांनी त्या आधारे पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. साक्षीदार कथन करतात की, घटनास्थळावर किती लोक हजर होते हे साक्षीदाराला रात्रीची वेळ असल्याने दिसुन आले नाही. साक्षीदार नाकारतात की, त्यांचे सरतपासात नमुद केलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे.

८. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी साक्षीदार क्र. २ चिंधु राघोबाजी भोयर (घटनास्थळ पंच ) यांची साक्ष नि. २४ वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, दिनांक १५.०५.२०२२ रोजी पोलिसांनी साक्षीदाराला मौजा येवती येथे छाया दरोडे यांच्या घरासमोर घटनास्थळपंचनाम्याकरीता बोलावीले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष पंचनाम्याची कार्यवाही केली नाही. साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखवीण्यात आला त्यावर केवळ त्यांची सही आहे परंतु त्यातील मजकुर साक्षीदाराला माहित नाही. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराचा उलटतपास घेतला त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले की, पोलीसांनी दिनांक १५.०५. २०२२ रोजी येवती येथे छाया दरोडे यांच्या घरासमोर घटनास्थळ पंचनाम्याकरीता साक्षीदाराला बोलावीले होते व पंचनाम्याची कार्यवाही त्यांच्या समक्ष केली होती. साक्षीदाराने नाकारले की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा साक्षीदाराला वाचून दाखवून त्यावर त्यांची सही घेतली. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**०९.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी साक्षीदार क्र. ३ गणेश नथ्थूजी दरोडे (साक्षीदार ) यांची साक्ष नि. २५ वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, साक्षीदार आरोपीस ओळखतो. फिर्यादी छाया ही त्यांची पत्नी आहे घटना ही दिनांक १३/०५/२०२२ रोजी मौजा येवती येथील त्यांच्या घरी १०.०० ते १०.३० च्या दरम्यान घडली होती. साक्षीदार त्यावेळी वर्धाला गेलो होते. साक्षीदाराला त्यादिवशी रात्री १०.३० वाजता घरी आल्यानंतर त्यांच्या घराचे गेट मोडलेले दिसले.

त्यावर साक्षीदाराने त्यांच्या पत्नीस काय झाले असे विचारले असता, तिने साक्षीदाराला सांगितले की, "आरोपी विकास याने तिला शिवीगाळ करून घराच्या गेटला गाडी धडकविली" त्यावर साक्षीदार व त्यांची पत्नी पोलीस ठाण्यात जावुन आरोपीविरूध्द रिपोर्ट दिला. याव्यतिरीक्त काही घडले नाही. पोलीसांनी साक्षीदाराचे बयान नोंदविले होते किंवा कसे हे साक्षीदाराला आठवत नाही. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने मान्य केले की, पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले नाही, साक्षीदाराने घटना प्रत्यक्ष डोळयांनी पाहिली नाही. साक्षीदाराने कथन केले की, असे काही घडले नाही की, घटनेच्या दोन दिवसानंतर आम्ही पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला.

**१०.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी साक्षीदार क्र. ४ शशीकांत मधूकर निमसटकर (साक्षीदार ) यांची साक्ष नि. २६ वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, साक्षीदार फिर्यादी नामे छाया यांना ओळखते कारण साक्षीदार कोतवाल संघटनेचा जिल्हा अध्यक्ष असतांना फिर्यादी ही महिला अध्यक्ष असल्याने साक्षीदार फिर्यादीस ओळखतो. साक्षीदार सन २०२२ मध्ये मारेगाव तहसिल येथे कोतवाल या पदावर कर्तव्यावर होते व कोतवाल संघटनेचा जिल्हा अध्यक्ष होते. घटना दिनांक १३.०५.२०२२ रोजी रात्री १०.३० वाजताच्या दरम्यान मौजे येवती ता. राळेगांव जि. यवतमाळ येथे फिर्यादीच्या राहत्या घरी घडली. घटनेच्या वेळी आरोपी नामे विकास सेवेकर हा फिर्यादीच्या घरी मोटर सायकलने आला व आरोपीने त्याच्या मोटरसायकलने फिर्यादीच्या घराच्या गेटला धडक दिली. तेव्हा आरोपीने फिर्यादीला त्यावेळी म्हणाला 'साले मादरचोद तू बाहेर निघ तुला दाखवतो, तू तलाठी ऑफीसमध्ये जावून झवून घेते, तू तलाठी यांना आम्ही ट्रॅक्टरने वाळूचोरी करत असल्याची माहिती देते, तू बाहेर भेट मी तुला

ट्रॅक्टरने चिरडून टाकतो.' असे म्हणाला. घटनेदिवशी रात्री अकरा ते सव्वा अकरा वाजताच्या दरम्यान फिर्यादीने साक्षीदाराला फोन केला व साक्षीदाराला वरीलप्रमाणे घटनेची हकीकत सांगीतली. साक्षीदाराने घटनेच्या दुस–या दिवशी वडकी पोलीस स्टेशन आली व त्यांच्या संघटनेच्या लेटर पॅडवर पोलीसांना घटनेबाबत निवेदन दिले. साक्षीदाराला अभिलेखावरील दाखल साक्षीदाराने दिलेले निवेदन दाखविण्यात आले, त्यावर त्यांची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, सदर निवेदनाला निशाणी क्रमांक २७ देण्यात आला. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने मान्य केले की, सदर प्रकरणात साक्षीदार आठ ते पंधरा दिवसापूर्वी न्यायालयात आले होते, साक्षीदार त्यावेळी फिर्यादीसोबत एक ते दिड तास बसले त्या दिवशी साक्षीदाराची साक्ष झाली नाही, आजदेखील साक्षीदार कोर्टात येवून दिड ते दोन तास झाले व साक्षीदार फिर्यादी नामे छाया दरोडे यांच्यासोबत कोर्टाच्या आवारात बसून होते. साक्षीदार पुढे मान्य करतात की, साक्षीदाराला प्रत्यक्ष घटना पाहिली नाही, साक्षीदार घटना कधी घडली, किती वाजता घडली व नेमके काय घडले हे सांगू शकत नाही. साक्षीदार पुढे मान्य करतात की, घटना घडली तेव्हा घटनास्थळी आजूबाजूला किती लोक होते हे साक्षीदार सांगू शकत नाही, घटना घडतेवेळी फिर्यादी नामे छाया दरोडे यांच्या घरामध्ये किती लोक हजर होते हे साक्षीदार सांगू शकत नाही, तसेच त्यावेळी किती लोक होते हे साक्षीदाराला माहिती नाही, साक्षीदार पुढे कथन करतात की, त्यांना फिर्यादी नामे छाया दरोडे यांच्या घरामध्ये किती सदस्य आहे याची माहिती आहे. साक्षीदार फिर्यादी यांच्या घरातील सदस्यांची संख्या सांगू शकतो. फिर्यादी यांच्या घरी पाच सदस्य असून पाच सदस्यापैकी तीन सदस्य सज्ञान आहे व दोन सदस्य अज्ञान आहे, तसेच त्यांची नावे साक्षीदाराला माहित नाही. हे साक्षीदाराला माहित नाही की, फिर्यादीच्या गावी मौजे येवती येथे फिर्यादीचे सख्खे नातेवाईक किती आहे

किंवा कसे. साक्षीदाराने घटना घडल्यानंतरच्या दुस–या दिवशी सकाळी अकरा ते बारा वाजताच्या दरम्यान वडकी येथील पोलीसांना निवेदन दिले. असे काही घडले नाही की, साक्षीदाराने निवेदन दिल्यामुळे पोलीसांनी आरोपी विरूद्ध सदर प्रकरणामध्ये फिर्याद नोंदविली. साक्षीदार मान्य करतात की, साक्षीदाराने निवेदन दिल्यानंतर पोलीसांचा आणि त्यांचा कोणत्याही प्रकारे सदर घटनेच्या अनुषंगाने संबंध आला नाही. साक्षीदार मान्य करतात की, साक्षीदाराने घटनेची माहिती नसल्यामुळे ऐकीव माहितीवरून साक्षीदाराने पोलीसांना निवेदन दिले. साक्षीदार मान्य करतात की, फिर्यादी व साक्षीदार संघटनेच्या कामानिमीत्त नेहमी एकमेकांच्या संपर्कात असतात.

**११.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी साक्षीदार क्र. ५ राम वसंतराव कुरटकर (घटनास्थळ पंच ) यांची साक्ष नि. २८ वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, साक्षीदार आरोपीला ओळखतो. आरोपी त्यांच्या गावातील रहीवासी आहे. पोलीसांनी साक्षीदाराला कोठेही घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलावले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणताही कार्यवाही केली नाही. साक्षीदारालाला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अनु. क्र. २ वर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर साक्षीदाराला माहित नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील अनु. क्र. २ वरील सहीस निशाणी क्रमांक २९ देण्यात आली. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे सरकारी विधिज्ञांनी सदर साक्षीदारांचा उलटतपास घेतला त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले की, साक्षीदाराला दिनांक १५.०५.२०२२ रोजी पोलीसांनी मौजे ग्राम येवती ता. राळेगांव जि. यवतमाळ येथील फिर्यादीच्या घराच्या समोर घटनास्थळ पंचनामाकरिता बोलाविले होते. साक्षीदार नाकारतात की, साक्षीदार पोलीस स्टॉफ सह

घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता घटनास्थळी गेलो. साक्षीदार नाकारतात की, फिर्यादीने दाखविलेल्या जागेचा पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, तो साक्षीदाराला वाचून दाखविण्यात आला, त्यातील मजकूर बरोबर असल्याने साक्षीदाराने त्यावर सही केली. साक्षीदार मान्य करतात की, साक्षीदार येवती या गावी माझ्या जन्मापासून राहतो, साक्षीदाराला येवती गावातील परिसर परिचयाचा आहे, घटनास्थळ पंचनाम्यातील नकाशा व चतुर्सिमा बरोबर आहे, साक्षीदाराला चांगल्या प्रकारे लिहता व वाचता येतो. साक्षीदार पुढे मान्य करतात की, साक्षीदार कुठलाही दस्तऐवज सही करण्याआधी तो वाचतो व बरोबर असले की त्यावर सही करतो. साक्षीदार नाकारतात की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर होता व तो साक्षीदाराने वाचून त्यावर सही केली. साक्षीदार मान्य करताता की, आरोपी हे त्यांच्या गावचे असल्याने आरोपी सोबत माझे चांगले संबंध आहे.

१२. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी साक्षीदार क्र. ६ शैलेश कवडूजी मानकर (साक्षीदार) यांची साक्ष नि. ३० वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, साक्षीदार आरोपीला ओळखतो. आरोपी त्यांच्या गावातील रहीवासी आहे. घटना अंदाजे चार वर्षापूर्वी सायंकाळी घडली, ती कुठे घडली याबाबत साक्षीदाराला माहित नाही. घटना कशी घडली याबाबत साक्षीदाराला माहित नाही. असे काही घडले नाही की, घटनेदिवशी आरोपीने फिर्यादीने अश्लील भाषेत शिवीगाळ करून फिर्यादीच्या वॉल कंपान्ड गेटला नुकसान केले. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षांस सहाय्य केले नाही त्यामुळे सरकारी विधिज्ञांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला, त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले की, दिनांक १३.०५.२०२२ रोजी घटना रात्री १०:०० वाजताच्या

दरम्यान मौजे येवती ता. राळेगांव जि. यवतमाळ येथे फिर्यादीच्या घरासमोर घडली. साक्षीदार पुढे नाकारतात की, त्यावेळी साक्षीदाराला आवाज आल्याने साक्षीदार त्यांच्या घराबाहेर आले, त्यावेळी साक्षीदाराला आरोपी हा फिर्यादी छाया दरोडे यांना म्हणाला ''साली मादरचोद तू गेटच्या बाहेर ये, तुला दाखवतो व तू आमच्या वाळूच्या ट्राक्टरची माहिती अधिका-यांना देते, तू तलाठी कार्यालयात जावून झवून घेते'' अशी अश्लील शिवीगाळ केली. साक्षीदार पुढे नाकारतात की, त्यावेळी आरोपी हा त्याच्या मोटार सायकलवर बसून छाया दरोडे यांच्या गेटला ठोस मारत होता. साक्षीदार पुढे नाकारतात की, साक्षीदाराने त्यावेळी मध्यस्थी केली असता आरोपीने साक्षीदाराला असे म्हटले की, ''तू मला विचारणारा कोण, सालेहो तुम्हाला पाहून घेतो'' अशी धमकी दिली व आरोपी तिथून पळून गेला. साक्षीदार पुढे नाकारतात की, त्यावेळी साक्षीदाराने फिर्यादी छाया दरोडे यांच्या वॉल कंपान्डच्या लोखंडी गेटची पाहणी केली असता ते गेट साक्षीदाराला वाकलेले दिसले. साक्षीदार पुढे नाकारतात की, त्यावेळी साक्षीदाराला विटेच्या भिंतीला वार केलेला दिसला. साक्षीदार पुढे नाकारतात की, आरोपीने त्यावेळी फिर्यादीच्या वॉल कंपान्ड तसेच लोखंडीगेटची अंदाजे पाच हजार रूपयाचे नुकसान झाल्याचे साक्षीदाराला दिसले. साक्षीदाराला अभिलेखावरील त्यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ साक्षीदाराला वाचून दाखविण्यात आला, त्यातील मजकूर साक्षीदाराला माहित नाही, तसा मजकूर त्यांच्या जबाबामध्ये पोलीसांनी का नमुद केला याचे कारण साक्षीदार सांगू शकत नाही. साक्षीदार मान्य करतात की, आरोपी त्यांच्या गावातील असल्यामुळे त्याच्याशी त्यांचे चांगले संबंध आहे. साक्षीदार मान्य करतात की, आरोपीवर कोणतीही कार्यवाही होवू नये असे साक्षीदाराला वाटते.

१३. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारी विधिज्ञ व

आरोपींचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. सरकारी साक्षीदार क्र. १ छाया गणेश दरोडे (फिर्यादी) यांची साक्ष नि. २२ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, घटना दिनांक १३.०५.२०२२ रोजी घडली. फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल मध्ये फिर्याद नोंदविल्याची तारीख १६.०५.२०२२ दिसून येते. फिर्यादीने त्याच्या साक्षीमध्ये फिर्याद देण्यास विलंब का झाला याचे स्पष्टीकरण दिले नाही, तसेच फिर्यादचे अवलोकन केले असता त्यावर फिर्यादीची सही नाही, सबब अभियोग पक्षाने सदर प्रकरणात फिर्याद सिद्ध केलेली नाही. फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, त्याच्या घराच्या शेजारी राहणारे शैलेश मानकर हे घटनास्थळी आले त्यावेळी आरोपीने त्यांना शिवीगाळ केल्याचे कथन केले. सदर प्रकरणात शैलेश मानकर याची साक्ष निशाणी क्र. ३० वर नोंदविली. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे फिर्यादी यांची साक्ष व सरकारी साक्षीदार क्र. ६ नामे शैलेश कवडुजी मानकर यांच्या साक्षीमध्ये तफावत दिसून येते.फिर्यादीने त्यांच्या उलटतपासात कथन केले की, त्यांनी घटनेनंतर १५ – २० मिनिटात पोलीस ठाण्यात गेले होते व त्याच दिवशी रिपोर्ट दिला. अभिलेखावरील फिर्याद व प्रथम खबर अहवालचे अवलोकन केले असता त्यामध्ये दिनांक १६.०५.२०२२ असल्यचे नमुद आहे व घटना दिनांक १३.०५.२०२२ रोजीची असल्याचे दिसून येते. सरकारी साक्षीदार क्र. २ चिंधु राघोबाजी भोयर (घटनास्थळ पंच ) यांची साक्ष नि. २४ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सरकारी साक्षीदार क्र. ३ गणेश नथ्थूजी दरोडे (साक्षीदार ) यांची साक्ष नि. २५ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात कथन केले की, पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले होते किंवा कसे हे त्यांना आठवत नाही. सदर साक्षीदार त्यांच्या उलटतपासात मान्य करतात

की, पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले नाही, घटना प्रत्यक्ष त्यांनी पाहिली नाही. असे काही घडले नाही की, घटनेच्या दोन दिवसानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सरकारी साक्षीदार क्र. ४ शशीकांत मधूकर निमसटकर (साक्षीदार ) यांची साक्ष नि. २६ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही, घटना कधी, किती वाजता घडली हे साक्षीदार सांगू शकत नाही, किती लोक त्यावेळी हजर होते हे साक्षीदार सांगू शकत नाही, त्यांनी ऐकीव माहितीवर निवेदन दिले. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सरकारी साक्षीदार क्र. ५ राम वसंतराव कुरटकर (घटनास्थळ पंच ) यांची साक्ष नि. २८ वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. ६ शैलेश कवडूजी मानकर (साक्षीदार) यांची साक्ष नि. ३० वर नोंदविली. सरकारी साक्षीदार क्र. ५ राम व सरकारी साक्षीदार क्र. ६ शैलेश यांनी सरकारी पक्षास सहाय्य केले नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब आरोपीने फिर्याद प्रमाणे गुन्हा केल्याबाबत संशय निर्माण होतो. अशा परिस्थीतीत आरोपी याने तथाकथीत अपराध केल्याचे सिध्द होत नाही.

**१४.** भारतीय दंड संहिता कलम २९४,४२७,१८९ मधील तरतुदींचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाने सदर तरतुदींच्या अनुषंगाने कोणताही तोंडी अथवा प्रत्यक्षदर्शी असा सबळ आरोपी विरुध्द पुरावा अभिलेखावर आणलेला नाही, म्हणून आरोपी याने वरील कलमांतर्गत कृत्य केले असे आपल्याला पुराव्या अभावी निश्चितपणे म्हणता येणार नाही, म्हणुन पुराव्या अभावी उत्पन्न होणाऱ्या संशयाचा फायदा आरोपीला देणे न्यायोचित ठरते. परिणामी, सरकार पक्षाने आरोपी विरुध्दचे आरोप संशयाच्या पलिकडे सिध्द न केल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत, म्हणुन

वरील चर्चेच्या आधारे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी नामे, विकास पुंडलीक सेवेकार, रा. येवती ता. राळेगाव जि. यवतमाळ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान१८६० कलम २९४, ४२७,१८९ अन्वयें शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी यांचा जामीन व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रू १५,०००/– (पंधरा हजार रुपये) जामीन व बंधपत्र द्यावा.

४. सदर प्रकरणातील कोणताही मुद्देमाल जप्त नाही त्यामुळे जप्त मुद्देमाल बाबत कोणताही आदेश नाही.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषीत करण्यात आला.)

RAMCHANDRA DATTATRAYA MANE

Digitally signed by RAMCHANDRA DATTATRAYA MANE
Date: 2026.08.12 15:52:32 +0530

दिनांकः १२.०८.२०२६

**(रामचंद्र दत्तात्रय माने)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी राळेगाव
ता. राळेगाव जि. यवतमाळ.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे बरोबर आहेत.

लघुलेखक – श्री. जी. व्ही. चव्हाण

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग–१, राळेगांव.

| | | |
|---|---|---|
| आदेश दिनांक | : | १२.०८.२०२६ |
| पिठासीन अधिका–यानी स्वाक्षरी केलेली तारीख | : | १२.०८.२०२६ |
| आदेश/ न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | : | १२.०८.२०२६ |